श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-६ | जून-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## कोंकण विभागात प्रथमच नवजात बालकांचे आनुवंशिक दोष शोधणारी चाचणी

## (Inborn Errors of Metabolism IEM)



*'गॅस क्रोमॅटोग्राफी अ‍ॅण्ड मास स्पेक्ट्रोफोटोमिटर'*

आनुवंशिक दोषांची चाचणी करण्यासाठी 'गॅस क्रोमॅटोग्राफी अ‍ॅण्ड मास स्पेक्ट्रोफोटोमिटर' (GCMS) हे उपकरण स्थापित करून भ.क.ल.वालावलकर हॉस्पिटलने पुन्हा रुग्णसेवेसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. रिसर्च लॅबमधील या नवीन GCMS मशीनवर नवजात शिशूंच्या लघवीचे परीक्षण केले जाते व त्यामधील आनुवंशिक दोषांची चाचणी केली जाते.

नवजात शिशूंच्या जन्मजात ३०० पेक्षा अधिक दोषांची तपासणी केली जाते व त्यापैकी १४० ते १५० रोगांचे निदान लगेच करणे शक्य असल्याने त्यावर उपचार करता येतात व ते बरे होऊ शकतात, अन्यथा त्यामुळे मानसिक दुर्बलता (mental retardation) सारखे आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच आनुवंशिक दोष असणाऱ्या रुग्णांच्या लघवीमधील वेगवेगळ्या अतिसूक्ष्म प्रमाणातील घटकांची तपासणी केली जाते. सर्व प्रकारच्या नमुन्यातील रक्त, लघवीमधील संसर्ग दोष व स्टेरॉइड्स इत्यादीचीही तपासणी करता येते.

## रक्तातील साखरेचा निरंतर आलेख व मधुमेह नियंत्रित करण्याचे उपकरण (सी.जी.एम.)

निरंतर ग्लुकोज मॉनिटरिंग (सी.जी.एम.) हे स्वयंचलितपणे रक्तातील साखरेच्या पातळीवर लक्ष ठेवण्यासाठी एक प्रगत उपकरण आहे. निरंतर ग्लुकोज मॉनिटरिंग सिस्टीममुळे दिवसाचे २४ तास, प्रत्येक १५ मिनिटाला, याप्रमाणे सतत १४ दिवसातील आपल्या रक्तातील साखरेच्या पातळीमध्ये काय बदल घडतात हे पाहता येते आणि त्यामुळे आपण संपूर्ण दिवसात काय व किती प्रमाणात खाल्ले पाहिजे, व्यायाम आणि औषधे कशी संतुलित करावीत याबद्दल अधिक अचूक निर्णय घेण्यास मदत होऊ शकते. सी.जी.एम. स्क्रीनवरील ग्राफिक आपल्या रक्तातील साखरेचे प्रमाण किती प्रमाणात वाढत आहे किंवा कमी होत आहे हे दर्शविते. त्यायोगे आपल्याला आपल्या रक्तातील साखरेचे प्रमाण नियमित करण्याचा योग्य मार्ग निवडण्यास मदत होऊ शकते. कालांतराने रक्तातील साखरेचे प्रमाण नियमित झाल्याने मोठ्या प्रमाणात मधुमेह असलेल्या लोकांना निरोगी राहण्यास आणि रोगाची जटिलता टाळण्यास मदत होते. ही सुविधा वालावलकर रुग्णालयात ओ.पी.डी. क्र.३ येथे अल्प दरात उपलब्ध आहे.



*निरंतर ग्लुकोज मॉनिटरिंग उपकरण*

# किशोरवयीन मुलींसाठी पाच दिवसांचे निवासी शिबिर

दि. १६ एप्रिल ते २० एप्रिल २०१९ या कालावधीत हर्चे (ता. लांजा) येथील ‘बॅरिस्टर नाथ पै महाविद्यालया’तील ३९ किशोरवयीन मुलींसाठी पाच दिवसांचे निवासी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून मुलींना प्राथमिक आरोग्य तपासणी, तज्ज्ञांकडून किशोरवयातील मानसिक, शारीरिक आणि भावनिक बदलांविषयी मार्गदर्शन करण्यात आले व करिअर मार्गदर्शन करण्यात आले. या मुलींची शिवसृष्टीलाही भेट आयोजित करण्यात आली होती. हा उपक्रम भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटल व सुधा व्ही. कुलकर्णी, ‘किशोरावस्था होलीस्टिक केअर सेंटर’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला.



*किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करताना डॉ. सुवर्णा पाटील*

# कोकणात प्रथमच वेरिकोज वेन्ससाठी ‘लेझर सर्जरी’

दि. १८ व १९ मे रोजी डॉ. अनिरुद्ध कुलकर्णी (इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजिस्ट) आणि डॉ. भावेश पोपट (इंटरव्हेन्शनल रेडिऑलॉजिस्ट) यांनी भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटला भेट दिली. या वेळी वेरिकोज व्हेन्स, पायाच्या न बऱ्या होणाऱ्या जखमा, पायातील रक्त वाहिन्यांचे आजार आणि मधुमेह रुग्णांची तपासणी केली. वेरिकोज व्हेन्स बहुतेक वेळा पोटऱ्यांवर किंवा पायाच्या आतल्या भागावर आढळतात. या शिरा निळ्या किंवा गडद जांभळ्या रंगात, साधारणपणे सुजलेल्या स्वरूपात दिसून येतात. त्या कालांतराने वाढू लागतात आणि त्रासदायक होऊ शकतात म्हणून उपचार करणे आवश्यक आहे. लेझर शस्त्रक्रिया हा सर्वात उत्तम उपचार आहे. ही शस्त्रक्रिया वालावलकर रुग्णालयात अल्प दरात उपलब्ध आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आणि रविवारी डॉक्टर्सची टीम भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटलला भेट देते.

# आरोग्य शिबिर




*आरोग्य तपासणी शिबिर*

भ.क.ल. वालावलकर हॉस्पिटलची अशी धारणा आहे की, देशासाठी सर्वात मोठी सेवा ही मानवजातीची सेवा आहे. याच हेतूने वालावलकर हॉस्पिटल गेल्या २५ वर्षांपासून समाजाला विविध आरोग्यसेवा पुरवत आहे. त्याचबरोबर समाजातील वंचित आणि ज्यांना वैद्यकीय सेवेची आवश्यकता आहे अशा वर्गांनाही फायदा होईल, या हेतूने हॉस्पिटल कोकणात विविध आरोग्यशिबिरांचे व रक्तदानशिबिरांचे आयोजन करते. यात रत्नागिरी अणि सिंधुदुर्ग जिल्हाचा समावेश आहे.

हॉस्पिटलचे वैद्यकीय चिकित्सक, स्त्रीरोगतज्ज्ञ, शल्यचिकित्सक, अस्थिरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, त्वचातज्ज्ञ, दंतचिकित्सक, नेत्ररोगतज्ज्ञ अशी सर्व डॉक्टरांची टीम शिबिरात सहभागी होते. शिबिरामध्ये अल्पदरात रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, ई.सी.जी. तपासणी, पॅप स्मिअर तपासणी केली जाते. या आरोग्य शिबिरासाठीचा सर्व आर्थिक भार तसेच औषध वाटप आणि इतर खर्च हे वालावलकर हॉस्पिटलद्वारेच केले जातात. या स्क्रीनिंग शिबिरादरम्यान जर कुठल्या रुग्णाला पुढील तपासणी किंवा उपचाराची गरज भासली तर त्याला वाहतूक सुविधा उपलब्ध करून देऊन डेरवणला रुग्णालयात पाठवले जाते. दर महिन्याला अशी किमान ८ ते १० शिबिरे आयोजित केली जातात अणि सुमारे ५०० ते १००० लोकांची तपासणी होते. ४० ते ५० लोक विविध शस्त्रक्रिया आणि तपासणीसाठी डेरवणला पाठवले जातात. २०१२



*आरोग्य तपासणी शिबिर*

पासून रत्नागिरी तसेच सिंधदुर्ग जिल्ह्यात वालावलकर हॉस्पिटलने या आरोग्यशिबिरांचे व रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याला सुरुवात केली. आतापर्यंत सुमारे २५००० हजारपेक्षा जास्त लोकांना याचा फायदा झाला आहे. विविध शस्त्रक्रिया आणि तपासणीसाठी सुमारे पंधरा हजारपेक्षा जास्त लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दूरदूरच्या गावातील लोकांना अशा प्रकारच्या आरोग्यशिबिरांमुळे फायदा झाला. या शिबिरांमुळे प्राथमिक अवस्थेतच आजाराचे निदान झाल्यामुळे अनेक लोक व्याधिमुक्त झाले आहेत.

शिबिरे आयोजित केलेली विविध तालुक्यातील गावे :

| क्र. | तालूका | गाव |
|---|---|---|
| १ | चिपळूण | शिरगाव, आलोरे, कुंभार्ली, वीर, दुर्गवाडी, चिपळूण |
| २ | दापोली | दापोली, पंचनदी, पाटपन्हाळे, हर्णै, बुरोंडी, दाभोळ |
| ३ | खेड | खेड, कुरवळ-जावळी, घाणेखुंट, लोटे, बोरघर |
| ४ | गुहागर | गुहागर, आबलोली, शिर, पालपेणे, हेदवी, चिखली |
| ५ | संगमेश्वर | संगमेश्वर, धामापूर, बुरंबाड, माखजन, कसबा, देवरूख, कोळवण |
| ६ | रत्नागिरी | रत्नागिरी, जयगड, वाटद, सत्कोंडी, पावस, आरेवारे |
| ७ | राजापुर | राजापुर, जानसी, नाटे, भू, ओणी, पाचाल |
| ८ | लांजा | लांजा, वेरवली, कुळे |
| ९ | सिंधुदुर्ग | वैभववाडी, नाधवडे, कोकिसरे, लोरे, कासार्डे, देवगड, किंजवडे, कळसुली |
| १० | कणकवली | कणकवली, कलमठ, सोनवडे |
| ११ | कुडाळ | पणदुर, कुडाळ, वालावल, आकेरी, डिगस |
| १२ | मालवण | मालवण, कट्टा, पेंडूर, आचरा |
| १३ | वेंगुर्ला | शिरोडा, तुळसुली, उभादांडा, मोचेमाड, भोगाळे |
| १२ | सावंतवाडी | सावंतवाडी |

अशी अनेक गावांमधे विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येते.

# पिडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. प्रीती शानभाग



*डॉ. शानभाग अर्भकाची तपासणी करताना*

दि. १९ मे २०१९ रोजी पीडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. प्रीती शानभग यांनी वालावलकर हॉस्पिटलच्या बालरोग ओ.पी.डी. ला भेट दिली व खालील आजाराच्यासंबंधी तपासणी व उपचार केले.

- हातापायाला चेहऱ्याला सूज येणे,
- हिमोग्लोबिन कमी असणे,
- उच्चरक्तदाब, मूतखडे,
- आवर्तीमूत्रसंक्रमण,
- बेड वेटिंग,
- मूत्रपिंडजन्मजात दोष,
- किडनी रोग,
- मूत्रपिंड किंवा मूत्रमार्गाची तपासणी,
- मूत्राशय समस्या इ.

# कर्करोग, सुरुवातीची लक्षणे अणि उपाय – मार्गदर्शनपर व्याख्यान

दि. १४ मार्च २०१९ रोजी 'कर्करोग, सुरुवातीची लक्षणे अणि उपाय' या विषयावर 'रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालय' आणि 'लायन्स क्लब, रत्नागिरी' यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. वालावलकर हॉस्पिटलमधील डॉ. आसावरी मोडक आणि डॉ. नंदिनी शर्मा यांनी या कार्यक्रमाला संबोधित केले. तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग आणि लहान मुलांमधील कर्करोग यांच्या लक्षणांची आणि उपचार पद्धतींची माहिती दिली गेली. वालावलकर हॉस्पिटलमधे कर्करोग निदान व उपचार यासाठी स्वतंत्र विभाग आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवार टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधून डॉ. बाणावली यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर्सची एक टीम वालावलकर हॉस्पिटला भेट देते. किमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि कर्करोग शस्त्रक्रिया हे सर्व उपचार हॉस्पिटलमधे उपलब्ध आहेत. कर्करोगसाठी रुग्णांना 'महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने'खाली मिळणाऱ्या सवलती उपलब्ध आहेत.




*डॉ. आसावरी मोडक आणि डॉ. नंदिनी शर्मा सभेला संबोधित करताना*

# देहदान–अवयवदान मार्गदर्शन शिबिर, रत्नागिरी

दि. २७ एप्रिल २०१९ रोजी 'रेणुका प्रतिष्ठान, रत्नागिरी' तर्फे 'देहदान–अवयवदान' या विषयावर मार्गदर्शनपर भाषण आयोजित करण्यात आले होते. देहदान–अवयवदान ही सांप्रत काळातील एक महत्त्वाची गरज आहे हे आपण सर्व जण जाणतो. परंतु अद्यापही याबाबतीत आपल्याला फार कमी माहिती आहे. याबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. भ.क.ल.वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल डेरवण, डिपार्टमेंट ऑफ ॲनॉटॉमी'च्या डॉ. मोनाली सोनावणे यांनी 'देहदान–अवयवदान'या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला राष्ट्रसेविका समिती, कोकण प्रांत कार्यवाहिका मा. सुनंदाताई देवस्थळी या उपस्थित होत्या. भ.क.ल.वालावलकर रूरल मेडिकल कॉलेजच्या विविध संशोधन प्रकल्पांसाठी कॉलेजमध्ये देहदान स्वीकारले जाते. या प्रकल्पासाठी उत्तम प्रतिसाद मिळत आहे.




*डॉ. मोनाली सोनावणे मार्गदर्शन करताना*

# श्रीवासुदेवानंतसरस्वती पाठशाळेचे दोन विद्यार्थी 'ऋग्वेद क्रमान्त'परीक्षेत यशस्वी

श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित श्रीवासुदेवानंतसरस्वती पाठशाळेचे दोन विद्यार्थी वे. मू. मनोज माधव जोगळेकर आणि वे. मू. समीर विलास मिराशी यांनी श्रीश्रीजगद्‌गुरू शंकराचार्य महासंस्थानम् दक्षिणाम्नाय श्रीशारदापीठम्, शृंगेरी, संचालित 'वेदपोषकसभा' यांनी घेतलेल्या 'ऋग्वेद क्रमान्त' या परीक्षेत उत्तम यश मिळविले आहे. श्रीशारदापीठम् शृंगेरी, येथे नुकताच त्यांचा शृंगेरी शारदा पीठाधिश जगद्गुरू श्रीविधुशेखर भारती स्वामीमहाराज यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



*वे. मू. समीर विलास मिराशी, श्रीश्रीजगद्‌गुरू शंकराचार्य, श्रीशारदापीठम्, शृंगेरी, यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारताना*




*वे. मू. मनोज माधव जोगळेकर, श्रीश्रीजगद्‌गुरू शंकराचार्य, श्रीशारदापीठम्, शृंगेरी, यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारताना*

त्याचप्रमाणे श्रीशंकराचार्य पीठ, कांचीकामकोटी आणि अवधूत दत्तपीठम्, म्हैसूर यांनी घेतलेल्या 'ऋग्वेद क्रमान्त' या परीक्षेतही दोघांनी उज्ज्वल यश मिळवले आहे. श्रीवासुदेवानंतसरस्वती पाठशाळेमध्ये सुमारे पंधरा वर्षे खडतर अध्ययन करून मिळवलेल्या या यशाबद्दल सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. वे.मू. माधव परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'ऋग्वेद क्रमान्त' पर्यंतचे अध्ययन पुणे आणि डेरवण येथील पाठशाळेत वास्तव्य करून पूर्ण केले.

''श्रीवासुदेवानंतसरस्वती पाठशाळेत गुरुकुल पद्धतीने मिळालेले उत्तम शिक्षण, गुरुजनांनी आमच्या अध्ययनासाठी घेतलेले कष्ट आणि केलेले मार्गदर्शन, ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्रीकाकामहाराज जोशी यांनी दिलेले उत्तेजन, सर्व प्रकारच्या सोयी-सवलती, तसेच हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या दीर्घ कालावधीसाठी संस्थेने केलेली आर्थिक मदत यामुळे आम्ही हा अभ्यासक्रम विनाअवरोध पूर्ण करू शकलो. श्रीकाका आणि आमच्या गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील 'ऋग्वेद घनान्त' परीक्षाही आम्ही यशस्वीपणे उत्तीर्ण होऊ!'' असा विश्वास दोन्ही विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

श्रीसहजानंद सरस्वती स्वामी समर्थ महाराज यांनी वेदविद्येचे संवर्धन करण्यासाठी स्थापन केलेल्या या पाठशाळेने काही उत्तम वैदिक समाजाला दिलेले आहेत. त्या परंपरेला साजेशी कामगिरी करणाऱ्या या तरुण वैदिकांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!



*वे. मू. मनोज माधव जोगळेकर*



*वे. मू. समीर विलास मिराशी*

# ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलात विविध मैदानी शिबिरांचे आयोजन

कोकणातील निसर्गसौंदर्य आणि ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलातील उत्कृष्ट सुविधांचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत खेळाडू आणि प्रशिक्षक या क्रीडासंकुलाकडे आकर्षित होत आहेत. क्रीडासंकुलातील उत्तम दर्जाचे मैदान तसेच खेळाडूंना पूरक अशी स्विमिंग, जिमनॅशियम, इंडोअर स्टेडियम, उत्तम निवास व भोजन व्यवस्था यामुळे येथे मुलांचा सराव उत्तम होतो.

मे महिन्यात संकुलात मुंबई येथील अनुभवी प्रशिक्षक दत्ता चव्हाण यांचे सराव शिबिर संपन्न झाले. यामध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश होता. मैदानावरील सरावाबरोबरच अनेक चित्रफितींच्या माध्यमातून खेळाडूंना सर्वांगीण प्रशिक्षण देण्यात आले.

पुणे येथील ‘युनिक स्पोर्ट्स’चे प्रशिक्षक संजय पाटणकर यांचे ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिर दि. २ मे ते १५ मे दरम्यान संपन्न झाले. यामध्ये सिद्धी हिरे, अवंतिका नराळे आदी पंधराहून अधिक आंतरराष्ट्रीय खेळाडू, वीसहून अधिक राष्ट्रीय खेळाडू उपस्थित होते. या वेळी प्रशिक्षक पाटणकर यांनी सांगितले की गेली अनेक वर्षे आम्ही येथे शिबिरासाठी येत असून येथील शिबिराचा मुलांना पुढील स्पर्धांसाठी अत्यंत फायदा होतो. शिबिरादरम्यान त्यांनी स्थानिक खेळाडूंनादेखील मार्गदर्शन केले व अधिकाधिक खेळाडूंनी या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

मुंबई येथील ‘अचिव्हर्स क्लब’चे प्रशिक्षक निलेश पाटकर यांचे ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिर क्रीडासंकुलात दि. २९ एप्रिल पासून जोमात सुरू झाले. हे प्रशिक्षण शिबिर महिनाभर सुरू होते. श्री. पाटकर यांनी अनेक उत्तमोत्तम खेळाडू घडविलेले आहेत व त्याचबरोबर ते अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी पदाधिकारी म्हणूनही काम बघतात. या प्रशिक्षण शिबिराला विधी सिंघ, अक्षय खोत हे आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच गौरव हंबरे, अदिती परब तसेच सानिका नाटे हे राष्ट्रीय पदक विजेते खेळाडू समाविष्ट होते तसेच अनेक राष्ट्रीय व राज्य स्तरावरील खेळाडू उपस्थित होते. ‘सकाळ व संध्याकाळचे प्रशिक्षणाला साजेसे वातावरण तसेच स्विमिंग, जिम व आवश्यक सुविधांमुळे मुले नक्कीच पुढे भरघोस यश मिळवतील.’ असे या वेळी श्री. पाटकर यांनी नमूद केले.

वाशी येथील ‘फादर ॲग्नेल स्कूल’चे प्रशिक्षक श्रीनिवास यांचेदेखील शिबिर संकुलात सुरू आहे. त्यामध्ये दिवेन्द्रा, जय भोईर वगैरे अनेक राष्ट्रीयपदक विजेते खेळाडू उपस्थिती आहेत. तसेच या सर्व वातावरणात स्थानिक तसेच खेड, दापोली, चिपळूण येथील अनेक खेळाडूंचाही कसून सराव सुरू आहे.

मे महिन्यातील या सर्व शिबिरांदरम्यान सुमारे ४५० खेळाडूंनी क्रीडासंकुलात कसून सराव केला आहे.







*उन्हाळी मैदानी शिबिर*




*उन्हाळी मैदानी शिबिर*



*उन्हाळी मैदानी शिबिर*

# युनायटेड इंग्लिश स्कूल (चिपळूण) मध्ये प्रशिक्षण शिबिर संपन्न

'एसव्हीजेसीटी' क्रीडा संकुलातील शुटींगचे प्रशिक्षक विशाल पवार तसेच धनुर्विद्या प्रशिक्षक प्रियंका खिंडरे यांनी युनायटेड इंग्लिश स्कूलमध्ये शुटींग व धनुर्विद्या खेळाचे प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणाला सुमारे १५० खेळाडूंचा समावेश होता. यामध्ये संकुलातील राष्ट्रीय खेळाडू शेजल चव्हाण व सिद्धी साळुंखे यांनी धनुर्विद्येचे प्रात्यक्षिकहि सादर केले. सदर प्रशिक्षण शिबिर हे युनायटेड इंग्लिश स्कूलचे क्रीडा शिक्षक सोमनाथ सुरवसे यांनी आयोजित केले. नवनवीन क्रीडा प्रकारांचे विद्यार्थ्यांना ज्ञान मिळावे तसेच त्यात उज्वल यश संपादन करण्यासाठी प्रेरणा मिळावी यासाठी या क्रीडा प्रकारांचा प्रशिक्षण शिबिरात समावेश केल्याचे मनोगत सुरवसे यांनी व्यक्त केले. तसेच शाळेचे विश्वस्त श्री. चितळे यांनी डेरवण येथील संकुल हे कोकणातील विद्यार्थ्यांसाठी वरदान असून अधिकाधिक मुलांनी त्याचा लाभ घ्यावा असे मनोगत व्यक्त केले.

# जलतरण प्रशिक्षणास बालचमुंचा उदंड प्रतिसाद

'एसव्हीजेसीटी' क्रीडा संकुलातील जलतरण तलावात दरवर्षीप्रमाणे या वर्षीही बालचमुंसाठी जलतरण प्रशिक्षण भरविण्यात आले आहे. या प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सदर प्रशिक्षण हे प्रशिक्षक संदिप पाटील तसेच प्रशिक्षक विनायक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. पंचक्रोशीतील पालक मुलांना स्विमिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी संकुलातील जलतरण तलावाकडे धाव घेत आहेत. लहान वयात मुले लवकर शिकतात तसेच त्यांना पाण्याची भीती शिल्लक राहात नाही आणि पोहण्यामुळे मुलांचा संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो व त्यांची उत्तम वाढ होते असे मनोगत प्रशिक्षकांनी व्यक्त केले.

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



भ.क.ल.वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज, डेरवण

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून जून २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ८ जून २०१९ | श्रवण यंत्र व वाचा-उच्चार तज्ज्ञ | बहिरेपणाचे मशीन व स्पीच थेरपीस्ट |
| ९ जून२०१९ | डॉ. शिवप्रसाद दाते (प्लास्टीक सर्जन), मुंबई | प्लास्टीक सर्जरी व उपचार |
| १५ जून २०१९ | टाटा हॉस्पिटलचे डॉक्टर्स, (कॅन्सर तज्ज्ञ), मुंबई | कॅन्सर तपासणी व उपचार |
| १५ जून२०१९ | डॉ. श्रीपाद बाणावली (कर्करोग तज्ज्ञ), मुंबई | कॅन्सर तपासणी व उपचार |
| १५ जून२०१९ | डॉ. सचिन विलेकर (डायबेटीक तज्ज्ञ), मुंबई | डायबेटीक फुट तपासणी व उपचार |
| १५ जून२०१९ | डॉ. अनिरूध्द कुलकर्णी (रेडीऑलॉजीस्ट), मुंबई | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| | डॉ. भावेश पोपट (रेडीऑलॉजीस्ट), मुंबई | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| १५ जून२०१९ | डॉ. सुजाता नाईक (होमीओपॅथी), मुंबई | त्वचारोग व गुप्तरोग तपासणी व उपचार |
| १६ जून२०१९ | डॉ. आनंद जोशी (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेची तपासणी व उपचार |
| १६ जून२०१९ | डॉ. ज्योती शर्मा (पिडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट), मुंबई | लहान मुलांच्या किडनीआजारावरील उपचार |
| १६ जून२०१९ | डॉ. रोहिणी सामंत (रुमॅटॉलॉजिस्ट), मुंबई | संधिवात व सर्व वातविकारावर उपचार |
| १६ जून२०१९ | डॉ. फुलरेणू चव्हाण (एंडोकायनोलॉजिस्ट), मुंबई | थायरॉईड, डायबेटिस उपचार |
| २३ जून २०१९ | डॉ.संजय ओक (बालरोग तज्ज्ञ), मुंबई | लहान मुलाच्या आजारावरील सर्व शस्त्रक्रिया व उपचार |
| ७ जुलै २०१९ | डॉ. अच्युत जोशी (नेफ्रॉलॉजीस्ट), पुणे | किडनी आजार व उपचार |
| ७ जुलै २०१९ | डॉ. के. एस. कुलकर्णी (मानसोपचार तज्ज्ञ), पुणे | मानसोपचार निदान व उपचार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व ३.०० नंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी वाचा-उच्चार तज्ज्ञ डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.


**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०